# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १०/२००९/ दिनांक :

श्री. नानाजी तायाप्पा संकपाळ, अर्जदार
मु.पो. कोसारी, ता. जत, जि. सांगली

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि., संवसु मंडळ कार्यालय,
विश्रामबाग , सांगली. विरूध्द पक्षकार

२) कार्यकारी अभियंता,
महावितरण, विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ,
जिल्हा सांगली.

३) सहाय्यक अभियंता,
महावितरण, उप विभाग, जत, जि. सांगली

<u>**कोरम**</u> :- १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य-सचिव
३ श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. जी.सी. लेले, सदस्य, ग्रा.त.नि.मंच यांचे तर्फे दिनांक : २३.०५.२००९

श्री. नानाजी तायाप्पा संकपाळ, रा. मु.पो. कोसारी यांनी गट क्र. ८७६ मध्ये नवीन शेती पंपासाठी दि. ५.६.२००८ रोजी अर्ज दिला. वि.प.ने दि. १३.१०.२००८ रोजी मंजुरी दिली. कृती मानकातील तरतुदी प्रमाणे चलन देण्यास विलंब झाला असल्याने भरपाई मिळावी व जोडणी मिळावी अशी अंतर्गत कक्ष, सांगली यांच्याकडे ' क्ष ' फॉर्ममध्ये तक्रार दाखल केली होती. सदर अर्जाचा क्र. २११ दि. ८.१.२००९ ने निर्णय झाला. त्यास चलन देण्यास झालेल्या विलंबाबद्दल भरपाई देणेचे तसेच अर्जाची पूर्तता झाल्यावर ' प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य ' या नैंसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार जोडणी द्यावी असे नमूद केले होते. सदर आदेशात भरपाईची रक्कम नमूद केलेली नाही म्हणून अ फॉर्ममध्ये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, कोल्हापूर परिमंडल, कोल्हापूर यांचेसमोर दि. २०.१.२००९ रोजी अर्ज दाखल केला.

सदर अर्ज प्रकरणी वि.प.कडून मुद्देनिहाय अभिप्राय मागविला व त्यानंतर दि. २४.३.२००९ रोजी सुनावणी निश्चित केली. तथापि मार्च अखेरीचे बील वसुलीचे काम असल्याने मुदतीचा अर्ज वि.प.कडून आल्याने दि. ९.४.२००९ रोजी सांगली सर्कल, विश्रामबाग, सांगली येथील कार्यालयात सुनावणी घेण्यात आली. सुनावणीच्यावेळी ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित होते. वि.प.तर्फे कोणीही उपस्थित नव्हते.

मूळ तक्रार अर्ज, त्यावरील वि.प.चे म्हणणे, अंतर्गत कक्ष, सांगली यांचा निर्णय सुनावणीच्यावेळीची कथने व लेखी म्हणणे याचा एकत्रित विचार करता ग्राहकाची तक्रार मागणी व वि.प.ची कार्यवाही व म्हणणे खालील प्रमाणे –

अर्जदराची तक्रार व मागणी खालील प्रमाणे

अर्जदाराने शेती वापरासाठी जोडणीची मागणी दिनांक ५.६.२००८ च्या अर्जाने केली होती. खर्चाचे चलन देण्यास वि.प.ला विलंब झालेला आहे. दि. १३.१०.२००८ रोजी चलन दिलेले आहे. विलंबाबद्दल भरपाई मिळावी व मुदतीत जोडणी मिळावी अशी मागणी नोंदविली आहे.

वि.प.ची भूमिका

चलन देण्यास विलंब झाला असल्याचे वि.प.ने मान्य केलेले आहे. तथापी तक्रारदाराचे जागेवर पाहणी केली असता विद्युत संच बसविलेला नाही. त्यामुळे संच उभा करुन तपासणी अहवाल दिल्यावर ' प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य ' या नैंसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार जोडणी देण्यात येईल. त्यासाठी ०.०६ कि.मी. लघुदाब वाहिनी उभी करावयाची आहे. दि. १९.१.२००९ रोजी चाचणी अहवाल दिला आहे. त्यांना मुदतीत जोडणी देण्यात येईल असे नमूद केले आहे.

सर्व बाजूंनी विचार करता, खालील मुद्दे निष्कर्षासाठी उदभवतात.

प्रश्न १ : चलन देण्यास विलंब झाला आहे काय ? झाला असल्यास किती काळ ?

उत्तर :– होय. चलन देण्यास १४ आठवड्यांचा विलंब झाला आहे.

प्रश्न २ : विलंब आठवड्यास कृती मानकातील तरतुदीप्रमाणे भरपाई देणे योग्य आहे काय ?

उत्तर :– योग्य आहे.

प्रश्न ३ : दिनांक १९.१.२००९ रोजी चाचणी अहवाल मिळाला असल्याने जोडणी देणे योग्य आहे काय ?

उत्तर :– वितरण मेन्सचा विस्ताव असल्याने दि. १९.१.२००९ नंतर तीन महिन्यांनी म्हणजे दि. १८.४.२००९ पर्यंत जोडणी देणे आवश्यक व योग्य आहे.

प्रश्न ४ : आदेश ?

उत्तर :– अंतिम आदेशा प्रमाणे

कारणमिमांसा

ग्राहकाने अर्ज केल्यावर म्हणजेच दि. ५.६.२००८ नंतर कृति मानकातील तरतुदीप्रमाणे वितरण मेन्सचा विस्तार असल्याने ३० दिवसांचे आंत ग्राहकाने करावयाच्या खर्चाचे चलन देणे आवश्यक होते. परंतु वि.प.कडून १४ आठवड्याचा विलंब (५.७.२००८ ते १३.१०.२००८) झाल्याने विलंबाच्या प्रति आठवड्यास रु. १००/– प्रमाणे १४ आठवड्याचे रु. १४००/– वि.प.ने ग्राहकास भरपाई म्हणून द्यावेत व सदरची रक्कम ग्राहकाच्या बिलात समायोजन करावी. वि.प.ने कृती मानकातील तरतुदीप्रमाणे तपासणी अहवाल दि. १९.१.२००९ रोजी प्राप्त झाल्याने जोडणी दिली जाईल असे लिखित स्वरुपात नोंदविले आहे.

अंतर्गत कक्षाच्या निर्णयातील तपशिलात कांही चुकीच्या नोंदी झाल्या आहेत. त्याकडे लक्ष देणे महत्वाचे आहे.

## आदेश

१) अंतर्गत कक्षाचा निर्णय अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२) ग्राहकास खर्चाचे चलन देण्यास वि.प.कडून झालेल्या विलंबापोटी भरपाई म्हणून ग्राहकास रु. १४००/– भरपाई देणेत यावी. सदरची रक्कम बिलामध्ये समायोजन करावी.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

(जी. सी. लेले)
सदस्य ग्राहक
ग्राहक तक्रार निवारण मंच,कोल्हापूर

श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष :

श्री. एस.आर. बांबळे, सदस्य सचिव :